निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
# आत्ताच एक्सप्रेस
✻ नांदेड ✻ परभणी ✻ हिंगोली

✻ मुख्य संपादक ✻
सुग्रीव सोपानराव मुंडे
✻ आवृत्ती संपादक ✻
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

✻ वर्ष १० वे ✻ अंक २९१ ✻ किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | ✻ मंगळवार दि.२४ फेब्रुवारी २०२६ | ✻ पाने-४

# ५०% आरक्षण मर्यादेवर सुप्रीम कोर्ट ठाम; महाराष्ट्रातील २२ जिल्हा परिषद निवडणुका पुन्हा लांबणीवर

**आत्ताच एक्सप्रेस**

**दिल्ली –** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर आज सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. राज्य सरकारकडून अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणुका घेण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी न्यायालयासमोर करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने यापूर्वी दिलेला आदेश कायम ठेवत ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुका घेण्यास मनाई कायम ठेवली आहे.

**५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्याने अडचण**

राज्यातील काही जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय (ओबीसी) आणि इतर प्रवर्गांना दिलेल्या आरक्षणामुळे एकूण आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांच्या घटनात्मक मर्यादेपेक्षा जास्त झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले होते की, विशेष परिस्थिती व ठोस आकडेवारीशिवाय ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देणे मान्य होणार नाही.

या पार्श्वभूमीवर राज्यातील २२ जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका सध्या प्रलंबित आहेत. न्यायालयाने आजच्या आदेशातही या निवडणुकांवरील स्थगिती कायम ठेवली आहे.

राज्य सरकारने न्यायालयात मांडणी करताना सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार दीर्घकाळ प्रलंबित ठेवणे योग्य नाही. अंतिम निकालाच्या अधीन राहून निवडणुका घेण्यास परवानगी द्यावी, अशी विनंती करण्यात आली. तथापि, न्यायालयाने ५० टक्के मर्यादेचा मुद्दा निकाली निघेपर्यंत निवडणुका घेण्यास परवानगी देण्यास नकार दिला.

न्यायालयाच्या आदेशामुळे संबंधित २२ जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया आणखी लांबणीवर पडणार आहे. सध्या या ठिकाणी प्रशासकीय यंत्रणेमार्फत कारभार सुरू असून, लोकप्रतिनिधींची निवड होईपर्यंत ही स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.

अ ा े ब ी स ी आरक्षणासंदर्भातील 'त्रिस्तरीय चाचणी' आणि ५० टक्के मर्यादा या दोन्ही मुद्द्यांवर अंतिम निर्णय होईपर्यंत राज्यातील काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चिततेत राहणार आहेत. या प्रकरणाचा निकाल राज्याच्या राजकीय व सामाजिक समीकरणांवर मोठा परिणाम करणारा ठरणार आहे.

एकूणच, सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या आदेशानंतर महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग तात्पुरता रोखला गेला असून, राज्य सरकारसमोर आता आरक्षण रचना कायदेशीर चौकटीत बसवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## हागदळमध्ये दुःखावर मात करणारी जिद्द : वडिलांच्या अंत्यसंस्कारानंतर लेकीने दिला बारावीचा पेपर; धैर्याला सर्वत्र सलाम

✻ आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**




**किनवट –** ''कितीही कठीण प्रसंग आला तरी शिक्षण सोडू नकोस,'' हा वडिलांनी दिलेला मंत्र उराशी बाळगत एका लेकीने अतीव दुःखावर मात करत बारावीची परीक्षा दिल्याची हृदयद्रावक पण प्रेरणादायी घटना हागदळ येथे घडली आहे.

माधव भीमराव देवकत्ते यांचे काल रात्री पुणे येथे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. आज सकाळी सुमारे ९:३० वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबावर शोककळा पसरलेली असताना आणि डोक्यावरचे पितृछत्र हरपलेले असतानाही, त्यांची कन्या कु. शिवानी माधव देवकत्ते हिने अद्वितीय धैर्य दाखवले.

वडिलांना अग्नी दिल्यानंतर अवघ्या दीड तासात, म्हणजेच सकाळी ११ वाजता शिवानी परीक्षा केंद्रावर पोहोचली आणि बारावीचा पेपर दिला. डोळ्यांत अश्रू, मनात वडिलांच्या आठवणींचा कल्लोळ आणि हृदयात दुःखाचा डोंगर असतानाही तिने धैर्याने प्रश्नपत्रिका पूर्ण केली.

वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि त्यांनी दिलेल्या शब्दाचा मान राखण्यासाठी दिलेली ही परीक्षा म्हणजे वडिलांना वाहिलेली सर्वोच्च श्रद्धांजली ठरली आहे. शिवानीच्या अदम्य जिद्दीचे, चिकाटीचे आणि मानसिक धैर्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून तिच्या या कर्तृत्वाला सर्वांनी सलाम केला आहे.

या कठीण प्रसंगातून सावरण्याची शक्ती तिला लाभो आणि तिच्या पुढील शैक्षणिक व आयुष्याच्या वाटचालीस भरभरून यश लाभो, हीच सर्वांची सदिच्छा.



## अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्यकारणी गठीत

### अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माहूर तालुका अध्यक्षपदी मनोज किर्तने यांची निवड
### अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे यांची उपस्थिती

✻ आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि २१ रोजी माहूरच्या विश्रामगृहात झालेल्या बैठकीत माहूर तालुका कार्यकारणीची निवड करण्यात आली

या बैठकीत सर्वानुमते माहूर तालुका अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अध्यक्षपदी मनोज कीर्तने तर उपाध्यक्ष म्हणून डॉ बाबाराव डाखोरे व राज ठाकूर कार्याध्यक्ष म्हणून ज्ञानेश्वर कराळे पाटील सल्लागार म्हणून डॉ प्रकाश जैन यांची निवड करण्यात आली प्रधान सचिव जयकुमार अडकिने व सुभाष खडसे बुवाबाजी विरोधी संघर्ष विभागाच्या अध्यक्षपदी पत्रकार इलियास बावाणी यांची निवड करण्यात आली विविध उपक्रम विभाग साजिद खान वैज्ञानिक जाणीव व शिक्षण प्रकल्प विभाग राजेंद्र चारोडे महिला सहभाग विभाग सौ सुरेखा तळणकर युवा सहभाग विभाग आकाश कांबळे जोडीदाराची विवेकी निवड विभाग ॲड गजानन चांदेकर जात पंचायत मूठमाठी अभियान विभाग प्राध्यापक विनोद कांबळे आंतरजातीय आंतरधर्मीय सत्यशोधकी विवाह विभाग प्राध्यापक राजेंद्र लोने विवेक जागर प्रकाशन व वितरण विभाग अर्जुन जाधव अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका विभाग राजेश मगरे मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभाग डॉ पद्माकर जगताप विज्ञान बोधवाहिनी विभाग मिलिंद कंधारे सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग एस एस पाटील सोशल मीडिया व्यवस्थापन विभाग राजकिरण देशमुख निधी व्यवस्थापन विभाग राजकुमार पडलवार कायदेविषयक व्यवस्थापन विभाग ॲड अविनाश ढगे व्यसन प्रबोधन आणि संघर्ष विभाग प्रल्हाद चव्हाण संविधान जागर विभाग ॲड भारतीताई गजानन शिंदे सर्वेक्षण आणि संशोधन विभाग उमेश डाखोरे दस्तऐवज संकलन विभाग राजीक शेख विवेक वाहिनी विभाग मंगेश जाधव यांचे सह मान्यवरांची विविध विभागात निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्वांचे स्वागत राज्याचे अध्यक्ष माधव बावगे यांनी करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय आरोग्यरत्न उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार
## राकेश भट्ट यांना मुंबईत आरोग्यमंत्री आबिटकर बोर्डीकर यांच्या हस्ते प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र शासनाकडून राज्यस्तरावर आदरणीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार दिला जातो. या संदर्भात दैनिक भास्कर, हिंगोलीचे जिल्हा प्रतिनिधी राकेश भट्ट यांना पत्रकारिता विभागातील २०२४ सालचा पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली.त्यानुसार रविवार २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मुंबईतील स्व.यशवंतराव चव्हाण सभागृहात पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था, डॉक्टर, पत्रकार आणि प्रादेशिक कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कार म्हणून एक लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यांच्या या विकास पत्रकारितेमुळे दैनिक भास्करचे पत्रकार राकेश भट्ट यांनाही पत्रकारिता क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने दिला जाणारा २०१४ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर केला आहे. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयातर्फे सलग तीन वर्षे म्हणजे २०११, २०१२ आणि २०१३ देण्यात येणाऱ्या संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या गृह मंत्रालयातर्फे दिला जाणारा महात्मा गांधी तंटामुक्ती ग्राम पुरस्कार २०११, ग्रामीण विकास जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण विकास मंत्रालयातर्फे दिला जाणारा राजमाता जिजाऊ स्वालंबन पुरस्कार २०१४ पत्रकार संघटनेचा दर्पण पुरस्कारही प्रदान करण्यात आला आहे. पत्रकार राकेश भट्ट यांना शासनाचे राज्यस्तरावर आदरणीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार देण्यात आल्याबद्दल राकेश भट्ट यांचे सर्व पत्रकार, मित्र व कुटुंबीयां तर्फे अभिनंदन केले जात आहे.



## राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा उपक्रमा अंतर्गत मुली घेत आहे योगाचे प्रशिक्षण

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई, यांच्या वतीने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील शाळांमध्ये मुलींसाठी राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियानांतर्गत प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणामध्ये मुलींना स्व संरक्षणासाठी आवश्यक विविध प्रकारातील प्रशिक्षण प्रशिक्षका मार्फत देण्यात येत आहे.



राज्यातील मुलींना प्रशिक्षक हे अधिकाधिक अद्यावत व परिपूर्ण प्रशिक्षण देत आहेत. त्या मधीलच एक भाग म्हणून मुलींना योगा चे प्रशिक्षण देण्यात येत आहे. योगा मुळे मुलीनं मध्ये उत्साह आणि आणि मनोबल वाढलेले दिसून येत आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या संकल्पनेतून व राष्ट्र प्रथम या ध्येयातुन मुलींना प्रशिक्षण देणे सुरु आहे. प्रशिक्षणाद्वारे मार्गदर्शन व सराव करून घेतला जात आहे. मुलींना आत्मसंरक्षण व आत्मविश्वास वाढीसाठी हा उपक्रम महत्त्वकांक्षी ठरणार असल्याचा विश्वास शिक्षण विभागाच्यावतीने व्यक्त करण्यात आला.

## जलयुक्त शिवार कामात हलगर्जीपणाचा स्फोट : माहूर कृषी कार्यालयावर चौकशीचे गंडांतर! दोषींवर कारवाईची टांगती तलवार

✻ आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**माहूर -** जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत करण्यात आलेल्या कामांमध्ये गंभीर हलगर्जी, नियमबाह्य मोजमापे व शासकीय प्रक्रियेचे उल्लंघन झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून माहूर कृषी कार्यालयातील जबाबदार अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार लटकू लागली आहे. शासकीय गुत्तेदारांनी थेट जिल्हाधिकारी तसेच जिल्हा कृषी अधीक्षकांकडे धाव घेत चौकशीची मागणी केल्यानंतर अखेर जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाने त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करून प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

सन २०२४-२५ मध्ये कृषी विभागाच्या जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील माहूर तालुक्यात मॅडकी (कार्यादेश क्र. जेएएल-२.०/३२८/२०२५ दि. २२/०४/२०२५) व मुंगशी (कार्यादेश क्र. जेएएल-२.०/३२९/२०२५ दि. २२/०४/२०२५) येथे ढाळीचे बांधकाम करण्यात आले. काम पूर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे अधिकाऱ्यांनी गुत्तेदारांच्या उपस्थितीत मोजमाप घेणे आवश्यक असताना तालुका कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी, सुपरवायझर व कृषी सहाय्यक यांनी वारंवार विनंती करूनही मोजमाप घेण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

गुत्तेदारांनी अनेक वेळा प्रत्यक्ष भेटी व दूरध्वनीद्वारे पाठपुरावा केला. प्रकरण जिल्हा कृषी अधीक्षकांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने तोंडी आदेश देऊन मोजमाप घेण्यास सांगितले, तरीही कारवाई झाली नाही. पुढे १७ डिसेंबर २०२५ रोजी नांदेड येथे बैठकीस बोलावले असता माहूरचे अधिकारी अनुपस्थित राहिल्याचे सांगितले जाते. त्यानंतर २२ डिसेंबर २०२५ रोजी भोकर येथील बैठकीत सर्वांसमक्ष आठवडाभरात मोजमाप सादर करण्याचे आदेश देण्यात आले; मात्र वरिष्ठ आदेशांचे वारंवार उल्लंघन करत संबंधितांनी विलंबच केला.




कामे २२ मे २०२५ पर्यंत पूर्ण झाली असताना आणि ९५० मि.मी. पेक्षा अधिक पर्जन्यमानामुळे अतिवृष्टी घोषित असतानाही कृषी विभागाने जानेवारी २०२६ मध्ये गुत्तेदारांना कोणतीही सूचना न देता त्यांच्या अनुपस्थितीत परस्पर मोजमापे घेऊन कार्यालयात सादर केल्याचा आरोप आहे. ही मोजमापे प्रत्यक्ष कामापेक्षा कमी दर्शवून मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे गुत्तेदारांचे म्हणणे आहे.

या प्रकरणात खालील गंभीर कायदेशीर उल्लंघनांचा आरोप करण्यात आला आहे

गुत्तेदारांच्या उपस्थितीत मोजमाप घेणे बंधनकारक असताना नियमभंग

जाणीवपूर्वक विलंब व चुकीची नोंद शासकीय कर्तव्यातील कसूर

आयपीसी १६६ अधिकाराचा दुरुपयोग करून नुकसान

आयपीसी ४२० आर्थिक फसवणूक

आयपीसी ४०९ विश्वासघात

या संदर्भात शासकीय गुत्तेदार विश्वा गुलाबराव शिंदे इंजिनियर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नांदेड व नारायण रामराव तमन्ना इंजिनियर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नांदेड यांनी २९ जानेवारी २०२६ रोजी सादर केलेल्या निवेदनावरून जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाने आदेश (क्र. जा.क./जि.अ.कृ.अ.नां./आस्था-४/७७०/२०२६ दि. १७/०२/२०२६) काढत चौकशी सुरू केली आहे.

**त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत**

प्रकरणाची प्राथमिक चौकशी करून १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**चौकशी समिती –**

✻ अध्यक्ष – कृषि उपसंचालक, जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, नांदेड

✻ सचिव – उप कृषी अधिकारी, नांदेड

✻ सदस्य – उप कृषी अधिकारी, नांदेड

**चौकशीच्या कक्षेत असलेली नावे**

श्री. के. एन. वानखेडे
श्री. एस. व्ही. उप्पलवार
श्रीमती पी. एस. देशमुख

समितीला तक्रारीतील मुद्द्यांची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांची नावे, पुरावे व स्पष्ट निष्कर्षासह अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**गुत्तेदारांची ठोस मागणी**

गुत्तेदारांनी पुढील कारवाईची मागणी केली आहे

✻ नव्याने स्थळ मोजमाप व योग्य नोंदी

✻ दोषींवर विभागीय चौकशी व निलंबन

✻ आर्थिक नुकसान भरपाई व्याजासह

✻ वेतनातून रक्कम वसुली

✻ आवश्यक असल्यास फौजदारी गुन्हे

✻ पुणे दक्षता पथकाद्वारे ग्रामस्तर चौकशी

या प्रकरणामुळे कृषी विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून चौकशी अहवालानंतर दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जलयुक्त शिवारासारख्या शेतकरी हिताच्या योजनेत झालेल्या कथित गैरप्रकारामुळे प्रशासनातील जबाबदारी व पारदर्शकतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# ओळखा पाण्याचा धोका!

पाण्याची गुणवत्ता ओळखा, असे आदेश नागपूर खंडपीठाने दिले. आताच लक्ष दिले नाही, तर भविष्यात सर्वाधिक जीव पाणी घेईल. पाण्याच्या गुणवत्तेच्या बाबतीत १२२ देशांमध्ये भारताचा क्रमांक चक्क १२०वा आहे, हे किती लोकांना ठाऊक आहे? सर्वांना स्वच्छ पाण्याची ग्वाही केंद्र सरकारने अनेकदा दिली. पाणी नक्की कुठे मुरतेय हे कळायला मार्ग नाही. भारतात सरासरी ११० सेंटीमीटर पाऊस पडतो. देशातील पाणीटंचाई काही संपलेली नाही. जगाच्या लोकसंख्येत आपला वाटा आहे १६ टक्के. म्हणजेच लोकसंख्येनुसार फक्त चार टक्के पाणी भारताच्या वाट्याला येते. प्रत्येकाला चार नाही तर, किमान दोन बादल्या पाणी सरकारने उपलब्ध करून द्यायला हवे. आपण या उद्दिष्टापासून कोसो दूर आहोत. सरकारच्या लेखा परीक्षण अहवालात ही खंत आली आहे. प्रदूषित पाण्याची नवी तलवार आपल्या मानेवर दबा धरून बसली आहे. पाण्याच्या बाबतीत आपण अनेक घोडचुका केल्या. पावसाचे फक्त १५ टक्के पाणी आपण साठवतो. उर्वरित प्रवाह थेट समुद्रात वाहून जातो. पिण्याच्या पाण्यातून संसर्ग झाल्याने सात कोटींहून अधिक दिवसांचे काम बुडते. ही आकडेवारी अंगावर काटा आणणारी आहे. त्यातून दर वर्षीचे नुकसान ३९ अब्ज रुपयांचे आहे. असा ताळेबंद दिला की समस्येची तीव्रता कळते. देशातील अनेक राज्यांच्या भूगर्भातील पाण्यात विषारी घटक आहेत. 'जल जीवन मिशन'च्या माहितीनुसार ग्रामीण भागातील १५ कोटी ६९ लाखांहून अधिक कुटुंबांना नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. हे मिशन २०२८पर्यंत चालणार आहे. युनेस्को दर वर्षी संयुक्त राष्ट्र जागतिक जल विकास अहवाल देते. तो पुढील महिन्यात २२ मार्चला विश्व जलदिनी मिळेल. या पार्श्वभूमीवर नागपुरातील एक उदाहरण महत्त्वाचे आहे. उन्हाळ्यात थंड पाण्यातून घशाला दिलासा मिळत असल्याने सामान्य माणूस पाण्याची क्वालिटी बघत नाही. नेमका तिथेच घोळ होतो. अनेक अधिकारी मेजवानी आटोपताच खुल्या पाण्याचे घोट घशाखाली उतरवित घरी परततात. त्या एका छोट्या कृतीतून कित्येक दीर्घ आजारांना आपण आपसूक गृहप्रवेश देतो. या गोष्टींची किती खोलवर तपासणी व्हायला हवी याची तीव्रता नुकतीच न्यायालयीन आदेशातून जाणवली. सोयीच्या सरकारी नियमांचा अंगीकार हे लोकधोरण असते. थंड केलेले खुले पाणी विकण्यास उच्च न्यायालयाने मनाई केली असतानाही उपराजधानीत प्रदूषित पाण्याचा खुलेआम व्यवहार आढळून आला. नागपुरातील आरओ चिल्ड वॉटर मॅन्युफॅक्चरर्स वेल्फेअर असोसिएशनने पॅकिंग न करता थंड पाणी विकण्याची परवानगी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात मागितली. न्यायालयाने ती फेटाळून लावली. सीलबंद कंटेनरची गरज ठणकावून सांगितली. 'ब्यूरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स'च्या प्रमाणपत्राखेरीज खुले पाणी विकणे बेकायदा असल्याचे स्पष्ट केले. खुल्या पाण्यावर ना किंमत असते, ना उत्पादकाचे नाव! नागपूर जिल्ह्यात ४८ परवानाधारक आहेत. आठशेहून अधिक ठिकाणांहून पाणी वितरित होते. मुख्य म्हणजे आता कुठे त्या संदर्भात केंद्राकडून कायदा तयार केला जातोय. या संदर्भात 'महाराष्ट्र टाइम्स'चा पाठपुरावा महत्त्वाचा ठरला. विनापरवाना वॉटर प्लांट्सचे सर्वेक्षण करून येत्या १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी नागपूर महापालिकेला दिले. जागतिक स्तरावर ऐंशी टक्के आजार आणि चिमुकल्यांच्या पन्नास टक्के मृत्यूचा संबंध जलप्रदूषणाशी आहे. भारतात ६० कोटी जीव पाण्यामुळे धोक्यात आहेत. येत्या चार वर्षांत सध्याच्या गरजेपेक्षा पाण्याची मागणी दुप्पट होईल. मेजवान्या आणि लग्न समारंभाचा सीझन बारमाही असतो. पाण्याच्या खुल्या कॅन्सचा वेळीच धोका ओळखावा. क्षणिक दिलासा हवा, की दीर्घ उपाययोजना हे भान राखले नाही तर पाणी आपला रंग दाखवेल.

# शीख समाजातील लंगर सेवा : मानवतेचा समतेचा आणि सेवाभावाचा तेजस्वी आदर्श



भारतीय संस्कृती आणि धर्मपरंपरा विविधतेत एकतेचा संदेश देणारी आहे. या महान परंपरेतील शीख धर्म हा मानवता, समता, सेवा आणि बंधुभाव यांचा संदेश देणारा एक प्रभावी धर्म म्हणून ओळखला जातो. शीख धर्माची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि जागतिक स्तरावर आदर्श ठरलेली परंपरा म्हणजे लंगर सेवा. लंगर सेवा ही केवळ धार्मिक विधी नसून, ती सामाजिक समतेची, परोपकाराची आणि मानवी करुणेची जिवंत परंपरा आहे.

**लंगर सेवेचा ऐतिहासिक उद्गम**

लंगर सेवेची संकल्पना शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक देव जी यांनी १५ व्या शतकात मांडली. त्या काळात भारतीय समाजात जातिभेद आणि सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. गुरू नानक देव जी यांनी या अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेला आव्हान देत सर्व मानव समान असल्याचा संदेश दिला. त्यांनी गुरुद्वारामध्ये सर्वांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था सुरू करून समाजातील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

पुढील गुरूंनी लंगर परंपरेला अधिक सुसंगठित आणि व्यापक स्वरूप दिले. विशेषतः गुरू अमरदास जी यांनी 'पंगत' आणि 'संगत' या संकल्पनांचा प्रचार करून लंगर सेवेचा सामाजिक पाया मजबूत केला. गुरुद्वारामध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने गुरूंच्या दर्शनापूर्वी लंगरमध्ये बसून भोजन करावे, असा नियम त्यांनी केला. यामुळे समतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजात रुजला.

**लंगर सेवेची तत्त्वज्ञानात्मक संकल्पना**

लंगर सेवेचे तत्त्वज्ञान तीन मूलभूत मूल्यांवर आधारीत आहे समता, सेवा आणि सामूहिकता. शीख धर्मानुसार देव सर्वत्र आहे आणि सर्व मानव देवाचेच अंश आहेत. त्यामुळे मानवांमध्ये भेदभाव करणे म्हणजे देवाच्या इच्छेचा अवमान करणे होय. लंगर सेवेच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरांतील लोक एकाच पंक्तीत बसून भोजन करतात. राजा असो वा सामान्य नागरिक, श्रीमंत असो वा गरीब, स्त्री असो वा पुरुषसर्वांसाठी समान आसन आणि समान अन्न दिले जाते.

लंगरमध्ये सेवा करणे हे शीख धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते. अन्न तयार करणे, वाटप करणे, पाणी देणे, भांडी धुणे, स्वच्छता राखणेहे सर्व कार्य स्वयंसेवक भावनेने केले जाते. या सेवेचे मूळ उद्दिष्ट अहंकाराचा त्याग करून मानवसेवेला सर्वोच्च मानणे हा आहे.

**लंगर सेवेची वैशिष्ट्ये आणि कार्यपद्धती**

लंगर सेवेची कार्यपद्धती अत्यंत सुव्यवस्थित आणि लोकसहभागावर आधारीत आहे. याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

मोफत भोजन व्यवस्था: लंगरमध्ये कोणालाही शुल्क न देता अन्न दिले जाते.

सर्वधर्मसमभाव: कोणत्याही धर्म, जात, भाषा किंवा देशातील व्यक्तीसाठी लंगर खुले आहे.

सामूहिक भोजन पद्धती: सर्वजण जमिनीवर एकाच पंक्तीत बसून भोजन करतात, ज्यामुळे सामाजिक समतेची जाणीव निर्माण होते.

स्वयंसेवी सहभाग: लंगर सेवा स्वयंसेवकांच्या सहभागावर चालते. समाजातील प्रत्येक व्यक्ती सेवा देऊ शकतो.

साधे आणि सात्त्विक अन्न: लंगरमधील भोजन साधे, पोषणमूल्यपूर्ण आणि सात्त्विक असते.

शिस्त आणि स्वच्छता: लंगरमध्ये स्वच्छता, शिस्त आणि सामूहिक सहकार्य यांना विशेष महत्त्व दिले जाते.

**लंगर सेवा आणि सामाजिक परिवर्तन**

लंगर सेवा ही केवळ धार्मिक सेवा नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे. इतिहासात भारतात जातीभेदामुळे समाजात विभाजन होते. लंगरने या विभाजनावर प्रहार करून समानतेचा संदेश दिला. गुरुद्वारामध्ये सर्वजण एकत्र बसून भोजन करतात, त्यामुळे सामाजिक भेदभाव नष्ट होतो आणि बंधुभाव वाढतो.

लंगर सेवा स्त्री-पुरुष समानतेचेही प्रतीक आहे. स्त्रिया आणि पुरुष समान अधिकाराने सेवा करतात. त्यामुळे लिंगभेदाविरुद्ध सामाजिक संदेश दिला जातो. तसेच लंगर सेवा गरीब, गरजू आणि उपेक्षित घटकांसाठी आधारस्तंभ ठरते.

**आधुनिक काळातील लंगर सेवेचे जागतिक योगदान**

आज लंगर सेवा केवळ भारतापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर मानवतेची सेवा करणारी चळवळ बनली आहे. भारतातील अमृतसर येथील हरमंदिर साहिब (स्वर्ण मंदिर) येथे दररोज लाखो भाविक आणि पर्यटकांना लंगर दिला जातो. हे जगातील सर्वात मोठ्या सामूहिक भोजन व्यवस्थांपैकी एक मानले जाते.

नैसर्गिक आपत्ती, पूर, भूकंप, दुष्काळ, युद्ध किंवा महामारीच्या काळात शीख समाजाने लंगर सेवेच्या माध्यमातून जगभर मानवतेची सेवा केली आहे. कोरोना महामारीच्या काळात भारतासह विविध देशांमध्ये शीख स्वयंसेवकांनी गरजू लोकांना मोफत भोजन पुरवले. ही सेवा मानवतेसाठी प्रेरणादायी ठरली.

**लंगर सेवेचा आध्यात्मिक आणि नैतिक संदेश**

लंगर सेवा ही केवळ भौतिक अन्नपुरवठा नसून ती आध्यात्मिक शिक्षणाची प्रक्रिया आहे. सेवा करताना अहंकाराचा त्याग, करुणेची भावना आणि मानवतेचा आदर विकसित होतो. शीख धर्मानुसार सेवा म्हणजेच ईश्वराची पूजा होय. गुरू ग्रंथ साहिबमध्ये सेवेला अत्यंत महत्त्व देण्यात आले असून, सेवेमुळे मानवाला आत्मिक शांती आणि नैतिक उन्नती प्राप्त होते, असा संदेश दिला आहे.

लंगर सेवा मानवी मूल्ये जपण्याची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करते. प्रत्येक व्यक्ती समाजाचा एक घटक असून समाजसेवेसाठी योगदान देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, ही भावना लंगरच्या माध्यमातून रुजवली जाते.

**शासकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून लंगर सेवा**

शासकीय दृष्टिकोनातून पाहता लंगर सेवा ही सामाजिक समावेशन, अन्नसुरक्षा आणि समुदाय विकासाची प्रभावी संकल्पना आहे. ही सेवा सामाजिक विषमता कमी करण्यास, गरिबी निवारणास आणि आपत्ती व्यवस्थापनात सहाय्यक ठरते. स्वयंसेवी संस्थांद्वारे आणि धार्मिक संस्थांद्वारे राबवली जाणारी ही सेवा सामाजिक सहभाग आणि लोकसहभागाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

लंगर सेवा ही लोकशाही मूल्यांशी सुसंगत असून समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांना प्रोत्साहन देते. त्यामुळे सार्वजनिक धोरण निर्मितीमध्ये आणि सामाजिक विकास कार्यक्रमांमध्ये लंगर मॉडेलचा अभ्यास प्रेरणादायी ठरू शकतो.

**निष्कर्ष**

लंगर सेवा ही शीख धर्माची एक महान देणगी असून ती मानवतेच्या समतेचे, सेवाभावाचे आणि बंधुतेचे प्रतीक आहे. ही सेवा धार्मिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक अशा सर्व स्तरांवर मानवाला प्रेरणा देते. आजच्या काळात वाढती विषमता, सामाजिक तणाव आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास यामुळे लंगर सेवेचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो.

"सेवा हीच सर्वोच्च पूजा" हा विचार लंगर सेवेच्या माध्यमातून संपूर्ण जगाला मिळालेला आहे. म्हणूनच लंगर सेवा ही केवळ शीख समाजाची परंपरा नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय आदर्श व्यवस्था आहे.

**– संजीवनी स.जाधव–पाटील,**
सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहित कार्यालय,
कोकण विभाग, नवी मुंबई

# पोलीस भरती करिता येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा विमा काढण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आम आदमी पार्टी चे बालाजी देशमुख यांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–**पोलीस भरती करता आवेदन पत्र भरणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा विमा उतरवण्याची विनंती आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष बालाजी देशमुख यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात असे नमूद केले आहे की अनुसरून महाराष्ट्र राज्यामधील बीड तसेच छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी भरती प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा रनिंग मारत असताना दुर्दैवी मृत्यू झालेला आहे.त्याच अनुषंगाने शासनाकडून त्या मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला आर्थिक भरीव मदत २५ लाख रुपये महाराष्ट्र शासनाच्या वतीने तात्काळ देण्यात यावी.

महाराष्ट्र राज्यातील भरती प्रक्रियेमध्ये डिमांड ड्रॉप च्या नावाने करोडो रुपये वसूल करणाऱ्या सरकारने डिमांड ड्राफ्ट भरणाऱ्या

विद्यार्थ्यांचा डिमांड ड्रॉप भरल्याबरोबर विमा काढण्याची प्रक्रिया राबवावी जेणेकरून महाराष्ट्र राज्यातील पोलीस भरती प्रक्रियेमध्ये



सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना काही दुर्दैवी घटना घडल्यास त्यांच्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य मिळेल. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील कुटुंबातील विद्यार्थी पोलीस भरतीची प्रॅक्टिस करण्यासाठी शहराच्या ठिकाणी राहून मोठ्या प्रमाणात पालकांचा खर्च विद्यार्थ्यांवर होत आहे. असे असताना मुलगा जर पोलीस भरतीमध्ये लागण्याऐवजी मृत्यूमुखी पडत असेल तर त्या इतके दुर्दैव नाही.

त्यामुळे शासनाने डिमांड ड्राफ्ट काढलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा तात्काळ इन्शुरन्स काढावा नंतरच पुढील भरती प्रक्रिया घेण्यात यावी अशी मागणी आम आदमी पार्टी हिंगोली जिल्हा प्रमुख बालाजीभाऊ देशमुख यांच्या वतीने करण्यात येत आहे.संबंधित प्रकरणांमध्ये प्रशासनाकडून दखल न घेतल्यास प्रशासनाच्या विरोधामध्ये मोठे जन आंदोलन करण्यात येईल याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. हिंगोली जिल्ह्यांमध्ये चालक या पदासाठी पोलीस प्रशासनाकडून भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली होती प्रत्यक्षामध्ये अल्पशा प्रमाणात जागा उपलब्ध असताना १३००० विद्यार्थ्यांनी फॉर्म भरले होते.

त्यामधून प्रशासनाच्या डिमांड ड्राफ्ट मध्ये ४५ लाख ५० हजार रुपये जमा झाल्याची माहिती समोर येत आहे.असे असताना प्रशासनाने भारतीय प्रक्रियेमध्ये समाविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचा विमा का काढण्यात येऊ नये असा प्रश्न आम आदमी पार्टीचे हिंगोली जिल्हा प्रमुख बालाजी देशमुख यांनी प्रशासनासमोर उपस्थित केलेला आहे.

# हिंगोली जिल्हा न्यायालयाचा मोठा निर्णय, जि.प.च्या मुख्याध्यापकाला पाच वर्षे सश्रम कारावास

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** कळमनुरी तालुक्यातील एका जिल्हा परिषद शाळेत अल्पवयीन तीन पीडितांवर अत्याचार करणाऱ्या तत्कालीन मुख्याध्यापकाला पाच वर्षे सश्रम कारावास व ७५ हजार रुपये दंडाच्या शिक्षेचा निर्णय जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश एस.एन. माने गाडेकर यांनी सोमवारी दिनांक २३ फेब्रुवारी ला दिला आहे. याबाबत जिल्हा सरकारी वकील ॲड.एन. एस. मुटकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कळमनुरी तालुक्यातील एका जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये तत्कालीन मुख्याध्यापक भगवान अवचार याने विशेष शिकवणी वर्ग घेण्याच्या बहाण्याने सहा अल्पवयीन पीडितांवर अत्याचार केल्याचा प्रकार सन २०२२ मध्ये उघडकीस आला होता. यामध्ये तीन पिडीतांनी आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. यावरून आखाडा बाळापुर पोलिसांनी तत्कालीन मुख्याध्यापक भगवान अवचार यांच्याविरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. सध्याचे पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक व तत्कालीन हिंगोली जिल्हा पोलिस दलाचे अप्पर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, पोलीस उपाधीक्षक विवेकानंद वाखारे, किशोर कांबळे सहाय्यक पोलीस निरीक्षक ,पंढरीनाथ बोधनापोड उपनिरीक्षक शिवाजी बोंडले यांच्या पथकाने अधिक तपास करून हिंगोलीच्या जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदरील प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश एस. एन. माने गाडेकर यांच्या न्यायालयात सुनावणीसाठी आले होते. या प्रकरणात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने मुख्याध्यापक भगवान अवचार यास पाच वर्ष सश्रम कारावास व ७५हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने जिल्हा सरकारी वकील ॲड.एस. एन. मुटकुळे यांनी काम पाहिले त्यांना ॲड.सविता देशमुख, ॲड.एस.डी. कुटे यांनी सहकार्य केले. पैरवी अधिकारी म्हणून जमादार सुनीता धनवे यांनी काम पाहिले.

INCA
INDIAN NATIONAL CINE ACADEMY

# प्रतिष्ठेचा 'इंका अवॉर्ड्‌स' १५ व १६ एप्रिल रोजी मुंबईत

इंडियन नॅशनल सिने अकॅडमी अवॉर्ड्स यांच्या पहिल्या पर्वाची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, हा भव्य सोहळा १५ आणि १६ एप्रिल रोजी मुंबईत संपन्न होणार आहे.

भारतामधील १२ प्रमुख चित्रपट उद्योगांना एका समान व्यासपीठावर आणणारा 'इंका' हा देशातील पहिला राष्ट्रीय चित्रपट अकॅडमी मंच आहे. भाषाभेद, प्रांतिक सीमारेषेच्या चौकटी ओलांडून, भारतीय सिनेमाची व्यापकता, वैविध्य आणि जागतिक स्तरावरील महत्त्व यांचा एकत्रित व समतोल सन्मान करण्याचा हा दूरदृष्टीपूर्ण स्तुत्य उपक्रम आहे. भारतीय चित्रपटसृष्टीच्या सांस्कृतिक एकात्मतेला संस्थात्मक स्वरूप देणारा हा उपक्रम अतिशय महत्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

'इंका'ची संकल्पना सेलिब्रिटी क्रिकेट लीग आणि साउथ इंडियन इंटरनॅशनल मूव्ही अवॉर्ड्स () संबंधित उपक्रमांचे संस्थापक व मार्गदर्शक यांच्या संकल्पनेतून साकारली असून, या उपक्रमाचे नेतृत्व विष्णू वर्धन इंदुरी करत आहेत. प्रोड्यूसर्स गिल्ड ऑफ इंडिया हे या उपक्रमाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे 'इंका'ला संस्थात्मक विश्वासार्हता, व्यापक दृष्टी आणि जागतिक स्तरावरील अकॅडमींच्या तोडीचा दर्जा प्राप्त झाला आहे. पहिल्या 'इंका अवॉर्ड्स'चे प्रस्तुत प्रायोजक म्हणून कल्याण ज्वेलर्स सहभागी झाले आहेत. उत्कृष्टता, परंपरा आणि विश्वास या समान मूल्यांवर आधारित ही भागीदारी 'इंका'च्या भव्यतेला अधिक बळ देणारी ठरणार आहे.

'इंका'ची रचना अकॅडमी-शैलीतील सन्मान प्रणालीवर आधारित असून, पारदर्शकता, तज्ज्ञांकडून मान्यता आणि विश्वसनीयता हा याचा गाभा आहे. १२ भारतीय भाषांतील प्रत्येक चित्रपट उद्योगासाठी सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्री या प्रमुख पुरस्कारांचा समावेश असेल. तसेच दिग्दर्शन, अभिनय, संगीत, तांत्रिक कौशल्य आणि पदार्पण अशा विविध राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांद्वारे प्रांतिक अभिमान आणि राष्ट्रीय उत्कृष्टतेचा सन्मान केला जाईल.

# आडगाव मुटकुळे येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी मॅरेथॉन स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण यांचे प्रतिपादन



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली तालुक्यातील आडगाव मुटकुळे येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी जयंती निमित्त नेहमी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण यांनी मॅरोथान स्पर्धेतून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळत असून यामधून विद्यार्थ्यांच्या अंगातील स्तुत गुणांना वाव मिळत असल्याचे प्रतिपादन केले.

त्यानंतर गावातील चौकामध्ये असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला मॅरेथॉन मध्ये विजेत्या स्पर्धकास बक्षीस वितरण करण्यात आले यावेळी गावचे सरपंच ज्ञानबा मुटकुळे, उपसरपंच रमेश पाटील, जेष्ठ नागरिक विठोबा मुटकुळे, विक्रमजी जाधव, समुदाय आरोग्य अधिकारी ठोके मॅडम, शामराव जाधव, आडे सर, गरबा सर, शिवजयंती कमिटी ग्रामपंचायतचे सर्व सदस्य गावातील सर्व गावकरी मंडळी महिला व पुरुष यावेळी उपस्थित होते मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते म्हणून मुनीर पठाण यांनी परिश्रम घेतले आणि जयंती कमिटी यांच्याकडून सर्वांना नाष्ट्याचे करण्यात आली मोठ्या उत्साहात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

# हिंगोलीत अल्पवयीन मुलांची धूम; वाहतूक शाखेच्या डोळेझाकपणामुळे अपघातांना निमंत्रण!

**※ निलेश गरवारे**

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली-** शहरात सध्या अल्पवयीन मुलांकडून बेदरकारपणे दुचाकी चालवण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. धूम स्टाईलने वेगात गाड्या पळवणाऱ्या या मुलांमुळे सर्वसामान्य नागरिक आणि पादचाऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, वाहतूक शाखेकडून होणारी कारवाई केवळ नावापुरती ठरत असून, पोलिसांच्या या डोळेझाकपणामुळे अपघातांना उघड निमंत्रण मिळत असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.



हिंगोली शहरातील इंदिरा गांधी चौक, अकोला बायपास, आणि मुख्य बाजारपेठ या भागांत शालेय वयातील मुले विनापरवाना वेगाने दुचाकी चालवताना दिसतात. एकाच दुचाकीवर तीन-तीन जण बसून स्टंटबाजी करणे, कर्कश हॉर्न वाजवणे आणि सायलेन्सरमध्ये बदल करून आवाज काढणे अशा प्रकारांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.काही दिवसांपूर्वी वाहतूक शाखेने मोहीम राबवून काही जणांवर दंड ठोठावला होता. मात्र, ही कारवाई केवळ फोटो काढण्यापुरती किंवा वरिष्ठांना अहवाल सादर करण्यापुरतीच मर्यादित असल्याचे दिसून येत आहे. कारवाई थांबताच पुन्हा ही मुले रस्त्यावर धुमाकूळ घालताना दिसतात. पोलिसांचा कोणताही धाक उरला नसल्याचे चित्र शहरात पाहायला मिळत आहे.

# सव्वा दोन लाखाचे केबल चोरले, बीएसएनएल ची सेवा ठप्पा

## बी एस एन एल च्या अभियंत्याच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल, चोरट्यास पकडून केबल केले हस्तगत एका अल्पवयीनास अटक एक फरार

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर गडावर जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या बीएसएनएल कार्यालयातील मुख्य केबल तार चोरट्यांनी तोडून लंपास केल्याने बीएसएनएलचे नेटवर्क काल ठप्प पडले होते पोलिसांनी शोध घेऊन एका अल्पवयीन आरोपीस अटक करून केबल हस्तगत करत गुन्हा दाखल केला असून एका आरोपीचा सुरू असल्याची घटना दि २१ रोजी रात्री उशिरा घडली आहे





मी रमेश बाबू अंदे वय ४० वर्षे व्यवसाय नौकरी उप विभागीय अभियमता बी एस एन एल कार्यालय माहुर रा. व्दारकानगर आदिलाबाद तेलंगाना यांनी फिर्याद दिल्याप्रमाणे भारत संचार निगम लिमीटेड उपविभाग माहूर येथे उपविभागीय अभियंता मम्हणुन सात महिण्यापासुन नेमणुकीस आहे. माझे मुख्यालय किनवट आहे.काल दि २० ०२ २०२६ रोजी रात्री १०.३० वा. चे सुमारास संपूर्ण बी एस एन एल यंत्रणा बंद झाल्यानंतर मला संदेश आला तेव्हा मी सकाळी उठल्यानंतर ०७.०० वा पाहिले असता मी लगेच सद्दाम स्थानिक तंत्रज्ञयांना मी कार्यालयात जावुन काय प्रकार ते मला पाहून मला सांगा असे सांगितल्याने सदर सद्दाम यांनी कार्यालयात जावुन पाहणि करून मला सांगितले की कोणी तरी अज्ञात चोरट्याने बी एस एन एल कार्यालयाची खिडकी वाकवून तोडत आत प्रवेश करुन आतील तांब्याची केबल वॉयर ज्या मध्ये तांब्याचे तार असलेले चोरुन नेल्या संबंधी मला सांगिल्याने लागलीच कार्यालयात येवुन पाहणी करुन पोस्टे येऊन तक्रार देतआहे यामध्ये१.३५००० रु किमंतीचे केबल वायर ज्या मध्ये तांब्याची तार असलेली ४५ मी लांबीची १५ मी लाल रंगाची, १५ मी निळ्या रंगाची, १५ मी काळ्या रंगाची केबल वायर ९०,००० रु सि डॉट कार्ड व केबल वायर कि. अं.

वरील वर्णनाचे भारत संचार लिगम लिमिटेड उपविभाग माहूर या कार्यालयाचे खिडकी तोडुन गज वाकून आत प्रवेश करून आत मध्ये असलेला केबल बायर ४५ मिटर लांबीचे कोणीतरी अज्ञात चोरट्याने रात्रीच्या वेळी अंदाजे १०.३० वा पुर्वी चोरुन नेले आहे व दि २०/१/२०२६ रोजी रात्रीच्या वेळी कोणीतरी अज्ञात चोरट्याने खिडकी तोडुन गज वाकून आत मधील सि.डॉट कार्ड प काही केबल चायर कि, ९०,००० रु चोरून नेल्या बाबत घटना घडली आहेत तरी भारत संचार निगम लिमीटेड उपविभाग माहूर या कार्यालयाचे खिडकी तोडुन जग बाकुन आत मधिल

केबल वायर किंमती २,२५००० रु किंमतीचे केबल वायर चोरुन नेणा-या अज्ञात चोरटया विरुध्द चोरिचा गुन्हा नोंदवून कायदेशिर कार्यवाई करण्यात यावी हि नम्र विनंती

अशी फिर्याद प्राप्त झाल्याने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी शहरातील एका अल्पवईनास अटक करून त्याच्या घराची झडती घेऊन केबल जप्त केली तर त्याचा सोबती मात्र फरार होण्याचे यशस्वी झाला या कार्यवाहीत पीएसआय बाबू जाधव पोहे का सत्यपाल मडावी पोका पवन राऊत रत्नदीप सोनसळे मोहुर्ले होमगार्ड सलमान खान एस पी भगत शेख रज्जाक यांनी मोलाची कामगिरी बजावली.



# हमीभावाने शेतमाल खरेदी केंद्र महिला बचत गटाला द्या, शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** नांदेड जिल्ह्यात पंधरा हजार हेक्टर वर मका हे पीक पेरले गेले असून त्यापैकी एकट्या किनवट तालुक्यात दहा हजार हेक्टर एवढी मका पिकाची पेरणी झाली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन होणारा मका खरेदी केंद्रावर घेऊन जाणे शेतकऱ्यांना परवडणारे नाही. त्यासाठी गावपातळीवर खरेदी केंद्र सुरू करावेत व फार्मर प्रोड्यूसर कंपन्यांना खरेदीचे अधिकार न देता त्याच गावातील महिला बचत गटांना खरेदी केंद्रे द्यावीत अशी मागणी यावेळी किनवट दौऱ्यावर असलेल्या जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाने केली. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा संघटनेने दिला होता. याचा परिणाम म्हणून येत्या २५ तारखेला तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभाग व शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन यावेळी किनवट तहसीलदार शारदा चौंडेकर यांनी दिले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते त्रिभुवन सिंह ठाकुर, रमेश कदम पाटील, मारुती सिनगारे, आत्माराम पाटील मुंडे, श्रीनिवास जमादार, बलराज बस्सी, रमण कागणे, ज्ञानोबा केंद्रे, देविदास माजळकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# माझी वसुंधरा अभियाना मध्ये हिंगोली नगर परिषद राज्यात दुसरा तर विभागात दुसरा क्रमांक

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत भुमी, जल, वायु अग्नी आणी आकाश या निर्सगाशी संबधीत पंचतत्व्वांवर आधारीत स्थानीक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धे अंतर्गत ५० हजार ते १ लक्ष लोकसंख्या गटामध्ये सर्वोतम कामगीरी करणाऱ्या शहरामध्ये ४.० मध्ये हिंगोली नगर परिषद राज्यात दुसरा क्रंमाक तर ५.० मध्ये छत्रपती संभाजी नगर विभागात प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त झालेला आहे.




माझी वसुधरा सन्मान सोहळा दिनांक २१.०२.२०२६ रोजी वार शनीवार, डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडीयम, लाला लजपराय मार्ग, वरळी मुंबई येथे सपंन्न झाला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव जयश्री भोज यांच्या हस्ते हिंगोली नगर परिषदेच्या नगरध्यक्षा सौ. रेखाताई श्रीरामदादा बांगर, गटनेते श्रीरामदादा बांगर, नगर परिषद हिंगोलीचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी, अरविंदजी मुंढे, नगर अभियंता प्रतीक नाईक, शहर अभियान व्यवस्थापक पंडीत मस्के ४.० माझी वसुधरा अभियान स्पर्धेमध्ये राज्यात दुसरा क्रमाकाचे बक्षीस चार कोटी रूपये तर ५.० माझी वसुधरा अभियान स्पर्धेमध्ये विभागात प्रथम क्रमाचे बक्षीस ७५ लाख रूपये असे एकुण चार कोटी पंचाहत्तर लाख रूपये बक्षीस व सन्मानचिन्ह देवुन गौरविण्यात आले. माझी वसुधरा अभियाना अंतर्गत हिंगोली नगर परिषदेने विभागात प्रथम तर राज्यात दुसरा क्रंमाक मिळविल्यामुळे नगर अध्यक्षा सौ. रेखाताई श्रीराम बांगर, उपाध्यक्ष मो.माबुद बागवान, नगर परिषद हिंगोली चे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्यासह सर्व नगरसेवकांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# तीन गावात हातभट्टी दारुचे अड्डे उध्वस्त, साडे सतरा हजार रुपयाचे दारु बनविण्याचे साहित्य नष्ट, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे स्वतः:च उतरले मैदानात

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर तालुक्यात हातभट्टी दारू बनविणाऱ्या वर गुन्हे दाखल झाल्याने तस्कर कोमात जात असताना हातभट्टी दारू बनविण्यासाठी नवीन तस्कर तयार होत असल्याने खबर मिळताच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे स्वतःच हातभट्टी अड्ड्यावर धाडी टाकून दारू बनविण्याचे साहित्य नष्ट करत आरोपींना जेर बंद करून जबरदस्त महाप्रसाद देण्यात येत असल्याने दि २१ रोजी एकाच दिवसात तीन गावात धाडी टाकून साडेसातरा हजार रुपयाचे दारू बनविण्याचे साहित्य नष्ट करण्यात येऊन तिघांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याची घटना घडल्याने हातभट्टी दारू बनविण्याचा विचार करणाऱ्यात घबराट पसरली आहे



माहूर तालुक्यात बेरोजगारीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने अनेक युवक व्यसनाधीन बनत चालले असून व्यसन करण्यासाठी स्वस्त पर्याय म्हणून हातभट्टी दारूला जग मान्यता मिळालेली आहे त्यामुळे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली खेड्यापाड्यात सुरू असलेले अनेक हातभट्टीचे अड्डे उध्वस्त करण्यात येऊन गुन्हे दाखल झाल्याने नवनवीन पिदाडे कमी खर्चात दारू काढून मोजमजा करण्याच्या नादात हातभट्टी लावण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत परंतु पोलिसांचे खबरी प्रत्येक गावात असल्याने माहिती मिळताच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे स्वतःच हातभट्टी अड्डे उध्वस्त करत गुन्हे दाखल करून वेळप्रसंगी गुन्हेगारांना जबरदस्त महाप्रसाद ही देत आहेत

दि २१ रोजी खबर मिळताच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी स्वतः पोलिसासमवेत इवळेश्वर येथील नाल्यात धाड टाकून पन्नास लिटर दारूबविण्याचे रसायन तसेच कसार पेठ येथे २०० लिटर तर वानोळा येथे १०० लिटर मोह फुलाचे रसायन तसेच इतर साहित्य नष्ट करून तिघांवर गुन्हे दाखल केले असून एकूण १७ हजार ५०० रुपयांचे रसायन आणि साहित्य नष्ट केले असून या कारवाईत पोलीस निरीक्षक देविदास चोपडे पोहेका प्रकाश गेडाम पोहेका गजानन चौधरी पो का पवन राऊत पिठलेवाड रणमले राठोड यांनी कारवाई केली असून ठाणे आमलदार सौ पुष्पा पुसनाके यांनी गुन्हे दाखल केले आहेत.

# देगलूर महाविद्यालयातील खेळाडूंचा व्हॉलीबॉल युवा राज्य अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्रातून प्रथम

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर –** महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन द्वारे २१वर्षाखालील युवा राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा,वर्धा येथे दि.१९ ते २० फेब्रुवारी दरम्यान संपन्न झाले असून यात देगलूर महाविद्यालतील ०३ खेळांडूंनी संघात सहभाग घेत महाराष्ट्रातून अव्वल स्थान प्राप्त केले आहे यातील खेळाडू योगेश सुनील अरकलवार (बी.एस.सी तृतीय) शुभम प्रकाश माडपत्ते (बी.एस.सी तृतीय) साईकृष्ण बालाजी मंडलेवार (११वी कला) हे आहेत या खेळाडूंचे प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. निरजकुमार उपलंचवार, प्रा दिपक वावधाने व प्रा. सिताराम हाके यांचे मार्गदर्शन लाभले आहे.यांच्या या अविस्मरणीय यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य सूर्यकांत नारलावार,देवेंद्र मोतेवार,गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे,चंद्रकांत नारलावार,गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ,उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार,उपप्राचार्य प्रा. चमकुडे एम.एम. उपप्राचार्य डॉ.शेरिकर व्ही. जी.,पर्यवेक्षक श्री संग्राम पाटील,कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक,कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे



# रानडुकराच्या धडकेत वृद्ध शेतकऱ्यांचा मृत्यू

## उपचारादरम्यान यवतमाळच्या रुग्णालयात प्राणज्योत मालवली, वनविभाग वन्य प्राण्यांच्या बंदोबस्त करण्यात अपयशी

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर तालुक्यातील मौजे हरडफ येथील शेतात काम करत असताना रानडुकराने अचानक केलेल्या हल्ल्यात ७५ वर्षीय वृद्ध शेतकरी सखाराम मेश्राम हे गंभीर जखमी झाल्याची घटना दि २१ रोजी घडली होती उपचारादरम्यान यवतमाळ येथील रुग्णालयात रात्री ९.३० वाजता त्यांची प्राणज्योत मालवल्याची घटना घडल्याने हरडफ परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे



हरडफ येथील वयो वृद्ध शेतकरी सखाराम नागो मेश्राम हे नेहमीप्रमाणे आपल्या शेतात कामासाठी गेले होते. सकाळच्या सुमारास शेतात काम करत असताना, झुडपातून अचानक आलेल्या १५ ते १६ रानडुकराच्या कळपा मधील एका रानडुकराने त्यांना जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की मेश्राम यात गंभीर जखमी झाले. घटनेनंतर परिसरातील इतर शेतकऱ्यांनी धाव घेत त्यांना तातडीने वाई बाजार येथील रुग्णालयात दाखल केले येथून पुढे माहूर मार्ग यवतमाळला त्यांना नेण्यात आले उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. यवतमाळ येथील रुणालयात शेव विच्छेदन करून त्यांच्यावर मौजे हारडफ येथे दि २२ रोजी दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले वन विभागाकडून घटनेची दखल घेण्यात आली असून हल्ल्यात अनेक शेतकरी नागरिक गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झालेला आहे तरीही वन विभाग वन्य प्राण्यांच्या बंदोबस्त करण्यात अपयशी ठरत असल्याने वन विभागा प्रति नाराजी व्यक्त होत आहे.

# राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या प्रचार-प्रसिध्दी चित्ररथाचा हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५/२०२६ अंतर्गत विविध विभागाच्या कल्याणकारी विविध योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित चित्ररथाला आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती अनिता लव्हारे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रचार-प्रसिद्धी मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. हे चित्ररथ जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागात जाऊन प्रचार-प्रसिध्दी करणार असल्याने नागरिकांना तसेच लाभार्थ्यांना या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना, बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजना आदी योजनांचा समावेश आहे. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रसते योजना, रेशीम शेतीला प्रोत्साहन, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (एकत्रित), मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या कल्याणकारी योजनांवर आधारित तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रिकाचे देखील मान्यवरांच्या हस्ते यावेळी विमोचन करण्यात आले. हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी सांख्यिकी उपसंचालक एस. एम. रचावाड, जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, उपसंपादक चंद्रकांत कारभारी, श्रीकांत देशमुख, मनोहर भारती आदींची उपस्थिती होती.

# भूमी अभिलेख उपसंचालक कार्यालय नांदेड येथे स्थापन करण्याची मागणी,महसूल मंत्र्यांना निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** भूमी अभिलेख विभागाचे प्रस्तावित उपसंचालक कार्यालय लातूरऐवजी नांदेड येथे स्थापन करण्यात यावे, या मागणीसाठी हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघ व जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना राहूल गुप्ता जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या मार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे.



सध्या भूमी अभिलेख विभागाचे विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असून त्याचे विभाजन करून लातूर येथे उपसंचालक कार्यालय स्थापन करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती मिळत आहे. मात्र या निर्णयामुळे हिंगोली , परभणी, नांदेड या तीन जिल्ह्यांतील शेतकरी, व्यापारी, उद्योजक व सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व प्रशासकीय गैरसोय होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.


हिंगोली ते लातूर अंतर सुमारे २०० कि.मी. असून नांदेड हे केवळ सुमारे ८० कि.मी. अंतरावर आहे. परभणी ते नांदेड अंतर सुमारे ७० कि.मी. असून छत्रपती संभाजीनगर सुमारे १६० कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे लातूर येथे कार्यालय झाल्यास नागरिकांना प्रवास खर्च, वेळेचा अपव्यय आणि प्रशासकीय दिरंगाईचा अतिरिक्त ताण सहन करावा लागेल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

नांदेड हे भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ती ठिकाण असून रेल्वे व रस्ते संपर्काच्या दृष्टीने अधिक सक्षम आहे. त्यामुळे उपसंचालक कार्यालय नांदेड येथे स्थापन केल्यास हिंगोली, परभणी व नांदेड जिल्ह्यांतील लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

निर्णय अंतिम होण्यापूर्वी या विषयावर पुनर्विचार करून नांदेड येथेच भूमी अभिलेख उपसंचालक कार्यालय स्थापन करण्याचे आदेश द्यावेत, अशी सामूहिक मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. महसूल मंत्री सकारात्मक निर्णय घेतील, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

सदर निवेदनावर जिल्हा अध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, राज्य उपाध्यक्ष अनिल नैनवाणी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश बगडिया, तालुकाध्यक्ष संजय देवडा, शहराध्यक्ष सुमित चौधरी, कार्याध्यक्ष वसंत भट्ट, शिवाजी मेटकर, प्रद्युघ्न गिरिकर, जगजीत खुराणा, गजेंद्र बियाणी, सौरभ साकळे, चंदू वैद्य यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# किनवट पोलिसांची धडाकेबाज "मास रेड" : मटका अड्डे उद्ध्वस्त, गावठी दारू जप्त ४ कार्यवाहयांनी अवैध धंदे हादरले



* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांवर पोलिसांनी चालविलेल्या धडाकेबाज "मास रेड" मोहिमेमुळे मटका जुगार चालक व गावठी दारू विक्रेत्यांचे अक्षरशः धाबे दणाणले आहेत. शहर व परिसरातील विविध ठिकाणी एकाच वेळी छापे टाकत पोलिसांनी दोन मटका अड्डे उद्ध्वस्त केले, दोन गावठी दारू विक्रेत्यांवर कारवाई केली आणि एकूण चार स्वतंत्र गुन्हे दाखल करून अवैध धंद्यांना जबर धक्का दिला. या कारवाईमुळे बेकायदेशीर व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून किनवट पोलीस दलाचा धाक पुन्हा अधोरेखित झाला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पथकात पोलीस उपनिरीक्षक सागर झाडे, पोलीस अंमलदार दिलीप सिरमनवार, संग्राम मुंडे, हेड कॉन्स्टेबल प्रदीप आत्राम, सिद्धार्थ वाघमारे, ओंकार पुरी, तसेच पोलीस शिपाई संजय राजने यांचा समावेश होता.

पहिल्या कारवाईत पोलीस शिपाई सदाशिव माणिकराव अनंतवार यांच्या तक्रारीवरून विठ्ठल खंडू गीमेकर (वय ५२, रा. घोटी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपीकडून ₹८५० रोख रक्कम, मटक्याचे आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या, दोन कागदी स्लिप व बॉलपेन असा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत पोलीस शिपाई बाळू भुजंगराव कुडमेते (ब.क्र.२४) यांच्या फिर्यादीवरून देवराव सोनबा बोरकर (वय ५८, रा. कोठारी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्याच्याकडून ₹१,०५० रोख रक्कम, मटका चिठ्ठ्या व जुगार साहित्य जप्त करण्यात आले. दोन्ही आरोपी "टाईम ओपन" नावाच्या मटका जुगाराद्वारे लोकांकडून पैसे उकळत स्वतःचा आर्थिक फायदा करून घेत असल्याचे तपासात स्पष्ट झाले असून या दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल दिलीप सिरमनवार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

तिसऱ्या कारवाईत पोलीस शिपाई संजय दिगंबर राजने यांच्या फिर्यादीवरून इलवंत महादू मुरमुरे (वय ५३, रा. बोधडी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून दोन प्लास्टिक कॅनमध्ये सुमारे ४० लिटर हातभट्टीची गावठी दारू (अंदाजे किंमत ₹४,०००) जप्त करण्यात आली. तो विनापरवाना दारू साठवून विक्री करत असल्याचे उघड झाले असून या प्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सिद्धार्थ वाघमारे करीत आहेत. गावठी दारू विक्री संदर्भात आणखी एक स्वतंत्र गुन्हा नोंदविण्यात आला असून संबंधित आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे.

या धडाकेबाज कारवाईनंतर पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी स्पष्ट इशारा दिला की, किनवटमध्ये अवैध जुगार व दारू विक्री कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही; अशा कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहतील.

नागरिकांनी बेकायदेशीर कृत्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले. या "मास रेड" मोहिमेमुळे अवैध धंदेवाल्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून कायद्याचा धाक पुन्हा एकदा ठळकपणे जाणवू लागला आहे.

# शिवसेनेचा नांदेडमध्ये मास्टरस्ट्रोक; रवि भाऊ राठोड यांची जिल्हा सह-संपर्कप्रमुखपदी नियुक्ती!

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट**– आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात शिवसेनेने (एकनाथ शिंदे गट) आपली संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. माहूर-किनवट भागातील समाजकारणातील परिचित व्यक्तिमत्व रविभाऊ उत्तमराव राठोड यांनी आमदार हेमंतभाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश केला असून, त्यांची नांदेड जिल्हा सह-संपर्कप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**पक्षविस्तारासाठी सुदर्शन नाईक यांचा पुढाकार**

राठोड यांचा पक्षप्रवेश आणि ही महत्त्वपूर्ण नियुक्ती माहूर तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक यांच्या विश्वासामुळे आणि प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे. राठोड यांच्या येण्याने किनवट आणि माहूर तालुक्यात शिवसेनेची ताकद दुपटीने वाढणार असल्याचे बोलले जात आहे.

**आमदार व नामदार हेमंतभाऊ पाटील यांच्या हस्ते नियुक्ती पत्र**

आमदार तथा बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष हेमंतभाऊ पाटील यांच्या स्वाक्षरीने हे नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी राठोड यांना पुढील सूचना देण्यात आल्या आहेत:

* हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा प्रचार करणे.

* शिवसेना पक्ष वाढीसाठी सर्वसामान्यांना सोबत घेऊन कार्य करणे.

* दर महिन्याचा लेखी अहवाल बाळासाहेब भवन कार्यालयास सादर करणे.

**शिवसेना परिवारात उत्साहाचे वातावरण**

या नियुक्तीचे स्वागत करताना शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, माहूर तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक, किनवटचे युवा उद्योजक मनोज तिरमनवार नामदार हेमंत भाऊंचे जनसंपर्क अधिकारी सुनील गरड.वाई जिल्हा परिषद गटाचे पिंटूभैय्या पाटील वायफनीकर ज्येष्ठ शिवसैनिक विनायकराव देशमुख, विधानसभा समन्वयक हिरासिंग चव्हाण, संतोष दुबे आणि युवासेना तालुका संघटक युवा पत्रकार गोपाल नाईक यांनी रविभाऊ राठोड यांचे अभिनंदन केले आहे.

"रविभाऊ राठोड हे राजकारण आणि समाजकारणातील एक अनुभवी नाव आहे. त्यांच्या माध्यमातून अनेक जनहिताची कामे मार्गी लागली आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे माहूर-किनवट पट्ट्यात शिवसेना अधिक आक्रमकपणे कार्य करेल," असा विश्वास तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक यांनी व्यक्त केला.



# कोकमठाणा येथे राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय महिला प्रशिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न



* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**नांदेड** – शालेय शिक्षण विभाग व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या वतीने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील शाळांमध्ये मुलींसाठी राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियानांतर्गत प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणामध्ये मुलींना स्व संरक्षणासाठी आवश्यक विविध प्रकारातील प्रशिक्षण प्रशिक्षक मार्फत देण्यात येत आहे. राज्यातील मुलींना प्रशिक्षण देणाऱ्या या प्रशिक्षकांनी अधिकाधिक अद्यावत व परिपूर्ण प्रशिक्षण देता यावे, यासाठी राज्यभरातील महिला प्रशिक्षकांची कार्यशाळा अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल कोकमठाण येथे,आयोजित करण्यात आली होती. हे प्रशिक्षण शिबिर १७ व १८ फेब्रुवारी ला पूर्ण झाले . प्रशिक्षणात राज्यभरातील ५ हजार महिला प्रशिक्षक सहभागी झाले होते . शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या संकल्पनेतून व राष्ट्र प्रथम या ध्येयाची विकसित रूप म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मार्गदर्शनाने,तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक शिफू भारद्वाज व त्यांच्या टीम ने या कार्यशाळेत प्रशिक्षणाद्वारे मार्गदर्शन व सराव करून घेतला आहे. या महिला प्रशिक्षणार्थींना राज्यभरातील शाळांमध्ये अधिकाधिक सक्षमपणे प्रशिक्षण घेता यावे, यासाठी अधिक प्रशिक्षित करण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षकांना प्रमाणपत्र देण्यात आले. शासनाच्या महिला सबलीकरण आत्मसंरक्षण व आत्मविश्वास वाढीसाठी हा उपक्रम महत्त्वकांक्षी ठरणार असल्याचा विश्वास शिक्षण विभागाच्यावतीने व्यक्त करण्यात आला.

# किनवटमध्ये अवकाळी पावसाची जोरदार हजेरी; जनजीवन विस्कळीत, शेतकऱ्यांची चिंता वाढली

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – दिनांक २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी चारच्या सुमारास अचानक कोसळलेल्या पावसाने किनवट शहरासह गोकुंदा परिसरातील जनजीवन काही काळासाठी विस्कळीत झाले. गेल्या दोन-तीन दिवसांपासून हवामान अभ्यासकांकडून पावसाची शक्यता वर्तविण्यात येत होती; मात्र अपेक्षेपेक्षा अचानक झालेल्या या अवकाळी सरींनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.



सुरुवातीला रिपरिप सुरू झालेल्या पावसाने काही वेळात जोर धरला. शहरातील रस्त्यांवर साचलेली धूळ धुऊन निघाल्याने नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला. वातावरणात गारवा निर्माण झाल्याने उकाड्यापासूनही काहीशी सुटका झाली.

परंतु या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. सध्या शेतात उभे असलेले मका, गहू आणि ज्वारी यांसारखी पिके पावसामुळे आडवी होण्याची व कुजण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने शेतकरी हवालदिल झाले असून नुकसानीपासून बचावासाठी ते आभाळाकडे डोळे लावून आहेत.

दरम्यान, वातावरणातील अचानक बदलामुळे सर्दी-खोकला, ताप यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आरोग्य तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. नागरिकांनी हवामानातील बदल लक्षात घेऊन आवश्यक काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. अवकाळी पावसाने दिलासा आणि चिंता अशा दोन्ही भावना किनवट परिसरात निर्माण केल्या आहेत.

# अवकाळीचा तडाखा किनवट तालुक्यातील मका पीक जमीनदोस्त; बोधडी-कारला शिवारातील शेतकरी हवालदिल

## आमदार भीमराव केराम साहेबांनी तातडीने पंचनाम्यांचे आदेश देण्याची जनतेतून मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – फेब्रुवारी महिन्याच्या कडाक्याच्या उन्हात आज, २३ फेब्रुवारी रोजी दुपारी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने किनवट तालुक्यातील कारला आणि बोधडी खुर्द शिवाराला झोडपून काढले. या निसर्गाच्या कोपामुळे परिसरातील मका पिकाचे अतोनात नुकसान झाले असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी पूर्णपणे कोलमडून पडला आहे.

**हातातोंडाशी आलेला घास गेला!**

गेल्या काही दिवसांपासून बोधडी खुर्द परिसरातील शेतकरी पाण्याअभावी मका पीक वाचवण्यासाठी धडपड करत होते. डोळ्यादेखत पीक सुकत असताना शेतकरी हताश झाले होते. मात्र, आज झालेल्या अवकाळी पावसाने मदतीऐवजी संकटच आणले. वादळी वाऱ्यामुळे मक्याची उभी पिके अक्षरशः जमिनीला टेकली आहेत. यामध्ये देवानंद विष्णू मुंडे,परमेश्वर बाबुराव गुट्टे या शेतकऱ्याच्या शेतातील मका पूर्णपणे जमीनदोस्त झाली असून, अशीच अवस्था परिसरातील अनेक लहान-मोठ्या शेतकऱ्यांची झाली आहे.



एकीकडे निसर्गाची साथ नाही आणि दुसरीकडे पिकावर झालेला खर्चही निघणे कठीण झाले आहे.

अशा परिस्थितीत किनवट-माहूर विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री. भीमराव रामजी केराम साहेब यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. आमदार साहेबांनी तत्काळ तहसील कार्यालयाला आदेश देऊन महसूल आणि कृषी विभागामार्फत नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत आणि शासनाकडून भरीव मदत मिळवून द्यावी, अशी आर्त हाक हवालदिल झालेला शेतकरी देत आहे.

**शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू**

"आधीच पाणी नसल्याने पीक सुकत होते, आणि आता जे थोडेफार शिल्लक होते ते पावसाने आणि वाऱ्याने मातीमोल केले. आता जगायचे कसे?" असा सवाल नुकसानग्रस्त शेतकरी विचारत आहेत. शासकीय यंत्रणेने एसी कार्यालयातून बाहेर पडून प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी करावी आणि शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून आमदार साहेबांनी पुढाकार घ्यावा, अशी भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

# किनवट उपकेंद्रात स्व. उत्तमराव राठोड यांची ९६ वी जयंती उत्साहात साजरी; एआय तंत्रज्ञानाद्वारे घुमला स्व. उत्तमरावांचा आवाज

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संचलित कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र (उपकेंद्र), किनवट येथे माजी खासदार स्व. उत्तमरावजी राठोड यांची ९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा देत, किनवटच्या सर्वांगीण विकासातील त्यांचे ऐतिहासिक योगदान अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले सेवानिवृत्त उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत जाधव यांनी स्व. उत्तमराव राठोड यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, "किनवटचा आज जो विकास आपल्याला दिसतो, त्यामागे उत्तमरावजींचा अत्यंत दूरदृष्टीकोन होता. त्यांनी घातलेल्या पायाभरणीमुळेच या दुर्गम भागाला विकासाची नवी दिशा मिळाली आहे." त्यांच्या या अभ्यासपूर्ण भाष्याला उपस्थित विद्यार्थ्यांनी दाद दिली.

**एआय तंत्रज्ञानाचा अनोखा प्रयोग**

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा वापर. डॉ. योगेश आंबुलगेकर यांनी या तंत्रज्ञानाद्वारे स्व. उत्तमराव राठोड यांचा आवाज पुनरुज्जीवित केला. केंद्राच्या भविष्यातील वाटचालीबद्दल खुद्द उत्तमरावजींच्या आवाजात त्यांच्या भावना व्यक्त झाल्याने उपस्थित जनसमुदाय भावूक झाला होता.

मुख्य मार्गदर्शक डॉ. समाधान दराडे यांनी उत्तमरावजींच्या जीवनप्रवासाचा संक्षिप्त आढावा घेत त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

अध्यक्षीय समारोप करताना केंद्राचे समन्वयक डॉ. नितीन गायकवाड म्हणाले की, "कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या संवेदनशील नेतृत्वाखाली हे केंद्र आधुनिक व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन केंद्र म्हणून देशात आपली वेगळी ओळख निर्माण करीत आहे हीच खरी स्व. उत्तमराव राठोड यांना आदरांजली आहे. याप्रसंगी हायकोर्टाचे ज्येष्ठ विधिज्ञ श्रीकांत राठोड, सामाजिक कार्यकर्ते विनायक गव्हाणे, डॉ. सुनील व्यवहारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. योगेश आंबुलगेकर यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. श्रेयस पवार यांनी केले. आभार चेतन जाधव यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सह-प्राध्यापक डॉ. प्रमोद राठोड, प्रा. श्रीकांत दुधारे, रमेश जाकुलवार यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813